# प्रकरण पहिले

## माणकेश्वरची शिव-सटवाई : पार्श्वभूमी आणि स्वरूप


१.१ प्रास्ताविक

१.१.१ उस्मानाबाद जिल्हा आणि प्राचीन वास्तुमंदिरे

१.२ माणकेश्वरचा परिसर आणि ग्रामदैवते

१.२.१ 'माणकेश्वर'ची उत्पत्ती

१.२.२ 'शिव' मंदिराविषयक विविध मते

१.२.३ 'सटवाई' विषयी विविध मते

१.२.४ 'विश्वरूपा' नदीची उत्पत्ती

१.३ शिव-सटवाईचे स्वरूप

१.३.१ शिव

१.३.२ सटवाई

१.३.३ उपासनेचे स्वरूप आणि प्रयोजन

१.४ शिव-सटवाई मंदिर आणि मूर्ती

१.४.१ शिव मंदिर आणि शिवलिंग

१.४.२ सटवाई मंदिर आणि मूर्ती

१.४.३ कोरीव शिलालेख

१.४.४ छायाचित्रे

१.५ समारोप


LIBRARY

# प्रकरण पहिले

# माणकेश्वरची शिव-सटवाई : पार्श्वभूमी आणि स्वरूप

## १.१ प्रास्ताविक :

आज आपले जीवन अतिशय गतिमान झाले आहे. वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या प्रभावामुळे जुन्या देवधर्मावरील आपला विश्वास कमी होत आहे. परंतु धावपळीच्या, दगदगीच्या, संघर्षाच्या जीवनात आपण आधारही शोधीत आहोत. कर्मकांडास आणि व्रतवैकल्यास नावे ठेविता ठेविता आपण पुन: पुन्हा त्यांच्याकडे वळत आहोत. डालड्याच्या डब्यात तुळस लावणारी स्त्री अन् शहरात वडाचा शोध घेता येणार नाही म्हणून चित्रातील वडाची पूजा करणारी सुवासिनी आजसुद्धा दिसून येते. याचे कारण असे की, मनुष्य हा अगतिक आहे, श्रद्धाळू आहे, जुन्या परंपरेच्या दोऱ्यास भक्कम धरून ठेवणारा आहे.

'महाराष्ट्राचा देव्हारा तसा अतिपुरातन आहे. प्रागैतिहासिक काळापासून तो नाना देवतांनी गजबजलेला आहे; पूजापुरस्कारांनी सजलेला आहे; कथा गाथांनी गाजलेला आहे.'[१] महाराष्ट्राच्या देव्हाऱ्यातील या असंख्य दैवताचं त्यांच्या उपासना स्वरूपाचं निरीक्षण-परीक्षण करणं अन् त्यातून मराठी समाजाच्या आंतरिक आंदोलनाचे स्वरूप जाणून घेणे हा मोठा रंजक आणि उद्‌बोधक विषय आहे.

'काही अवघड कर्मकांडाची उपासना करण्यापेक्षा साधी सोपी भक्तीची उपासना करणे हा मराठी मनाचा धर्म आहे आणि या प्रवृत्तीचा इतिहास हजारो वर्षाचा आहे. म्हणूनच उपास्य दैवते भिन्नभिन्न भासली तरी, भक्तींचे स्वरूप मात्र एकच राहिलेले आहे.'[२] समाजाच्या भक्तीचा विषय बनलेल्या दैवतांच्या स्वरूपाची प्रकट चिकित्सा करणे, ही नाजूक बाब असून याची मला जाणीव आहे. समूहमनाच्या निष्ठा एखाद्या श्रद्धाकेंद्राशी दृढतेनं निगडीत झालेल्या असतात, तेव्हा त्या श्रद्धाविषयी चिकित्सा करण्याचे काम अधिक अवघड बनते, अधिक हळूवार बनते. प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर या विषयाचा आवाका मोठा आहे.

लोकसाहित्याचे संकलन करताना सर्वसाधारपणे दोन पद्धतीचा अवलंब करण्यात येतो.[३] १) संकलनाची क्षेत्रीय पद्धती २) संकलनाची स्तरीय पद्धती.सदर प्रबंधिकेच्या अभ्यासासाठी संकलनाची क्षेत्रीय पद्धतीचा वापर केला आहे.

मी मूळ खेड्यातला. माझ्या गावापासून माणकेश्वर हे गाव ३० कि. मी. अंतरावर आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पारंपरिक रीतिरिवाज, चालीरीती, रूढी, प्रथा, परंपरा, तेथील लोकांचे मातीशी असणारे नाते, त्यांचे दैनंदिन व्यवहार, त्यांची बोलीभाषा हे मी अगदी जवळून पाहिले व आस्वादले आहे. माणकेश्वर परिसरात विविध ग्रामदैवत असली तरी विश्वरूपा नदीच्या डाव्या तीरावर असणारी शिव-सटवाई ही हेमाडपंती मंदिरे मराठवाड्यातील सर्वात प्राचीन परंपरा लाभलेली मंदिरे असून त्यांची ख्याती फक्त भूम-परांडा तालुक्यात नव्हे तर महाराष्ट्र, कर्नाटक, मद्रास पर्यंत पसरलेली दिसून येते. या नदीच्या तीरावर उगमापासून अस्तापर्यंत अनेक शिवालय असलेली दिसून येतात. या देवतासंबंधीची सर्व माहिती ध्वनीमुद्रणाच्या तसेच लेखनीच्या सहाय्याने संकलित केली आहे. संकलन करताना बऱ्याच अडचणी प्राथमिक स्वरूपात आल्या; मुलाखती आणि प्रश्नावली तंत्राचा वापर करून संबंधित माहिती गोळा केली आहे.

'कोणत्याही भाषेत लिखित साहित्याची निर्मिती होण्यापूर्वी मौखिक परंपरेने चालत आलेले लोकसाहित्य अस्तित्वात असते. त्यामुळे लिखित साहित्याबरोबर मौखिक परंपरेतील लोकसाहित्याचाही अभ्यास आवश्यक ठरतो. लिखित आणि मौखिक अशा दोन्ही परंपरेतील साहित्याभ्यासानेच साहित्याचा समग्र अभ्यास होईल.'[४] लोकमानस ज्या कृती-उक्तीतून अभिव्यक्त होते त्या कृती-उक्तींचा समावेश लोकसाहित्यात होतो. लोकजीवनाच्या सर्वच अंगांना लोकसाहित्याने व्यापले आहे. जागतिकीकरणामध्ये लोकवाङ्मयाकडे दुर्लक्ष होत असले तरी अशा माहितीचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

### १.१.१ उस्मानाबाद जिल्हा आणि प्राचीन वास्तूमंदिरे :

हा जिल्हा महाराष्ट्र राज्यात आग्नेय भागात आहे. ‘उस्मानाबाद हे सोलापूरच्या उत्तरेस असून त्याचे पूर्वीचे नाव धारापूर अथवा धाराशिव होते.’[५] १९१० मध्ये निजाम मीर उस्मानअलीखाँ याने आपल्या राज्यरोहण प्रसंगी शहरास स्वतःचे नाव दिले. तेव्हापासून शहर उस्मानाबाद नावाने ओळखले जाऊ लागले. हैद्राबाद संस्थानच्या विभागणीनंतर हे शहर महाराष्ट्रात आले. उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम-परांडा तालुक्यात माणकेश्वर हे गाव समाविष्ट होते. या जिल्ह्यास मोठी अशी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय, ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

सुप्रसिद्ध संत गोरा कुंभार तेर गावचे रहिवासी. कुंथलगिरीची जैन लेणी तसेच उस्मानाबाद शहराजवळील चांभारलेणी व धाराशिवलेणी, बालाघाट डोंगराच्या कुशीतील जैन गुहा मंदिरे, यामधील शिल्प येथील प्राचीन कलेची साक्ष देतात. परांडा, नळदुर्ग, औसा, उदगीर येथील भुईकोट किल्ले उल्लेखनीय आहेत. ‘उस्मानाबाद व निलंगा येथील दर्गे, परांडा व औसा येथील मशिदी तसेच निलंगा येथील नीलकंठेश्वर व माणकेश्वर येथील महादेव यांची मनोहर शिल्पकाम असलेली मंदिर, समर्थांचे शिष्य कल्याणस्वामी यांचा डोमगाव येथील मठ आणि महाराष्ट्राचे एक प्रमुख कुलदैवत असलेल्या भवानीमातेचे क्षेत्र तुळजापूर यासाठी जिल्हा प्रसिद्ध आहे.’[६] याचबरोबर परांडा येथील हंसराज स्वामीचा मठ, तेर येथील मातृदेवतेची मंदिरे, सतीचे मंदिर, कवठापाठी मंदिर, जैनवास्तू मंदिरे, बौद्ध मूर्तीशिल्प व अवशेष, रामेश्वर मंदिरं आहेत. तेरणा नदीच्या उत्तर काठावरील काळेश्वर मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, आग्नेयस नृसिंह मंदिर, पात्रामध्ये त्रिपुरांतकेश्वर मंदिर, अणदुरचे माणकेश्वर मंदिर, कसगी येथील सिद्धेश्वर मंदिर, मुरूम येथील मंदिरे, जागजी येथील लक्ष्मी मंदिर, येरमाळ्याची येडेश्वरी, येडशीची दुर्गादेवी व रामलिंग तीर्थ, सोनारीचा श्री कालभैरव, उमारग्याचे महादेव मंदिर, अचलेर येथील हेमाडपंती प्राचीन शिव मंदिर अशी असंख्य भक्तांच्या या पूज्य देवता असलेल्या दिसून येतात. या जिल्ह्याला देवस्थानमुळे एक विशेष धार्मिक परंपरा लाभली आहे.

## १.२ माणकेश्वर परिसर आणि ग्रामदैवते :

'भूम महाल'[७] प्रामुख्याने पूर्वी भूम-परांडा एकच मतदारसंघ असल्याकारणाने ओळखला जायचा. आता भूम स्वतंत्र तालुका आहे. 'महाल'[८] याचा शब्दकोशातील एक अर्थ मंदिर असा आहे. प्रामुख्याने येथील प्रसिद्ध जैन तीर्थक्षेत्रे, मराठवाड्यातील सर्वात प्राचीन असणारी माणकेश्वर येथील शिव-सटवाई मंदिरामुळे या तालुक्यास महाल शब्दप्रयोग केला जात असावा.

'माणकेश्वर हे गाव निजाम राजवटीचे शेवटचे टोक. माणकेश्वर येथील श्री सटवाई देवीचे मंदिर गावाच्या पूर्वेस गावापासून अंदाजे १॥ कि. मी. अंतरावर विश्वरूपा नदीकाठावर आहे.'[९] निजामाच्या काळात हिंदू-मुस्लिम तणाव वाढत गेल्याने बरीच कुटुंबे माणकेश्वरपासून २० कि.मी. अंतरावर असणाऱ्या बार्शीला स्थलांतरीत झाली. माणकेश्वर गावातील लोक फारच हौशी होते. प्रत्येक वर्षी दसऱ्याला सर्व गावकरी सीमोल्लंघनाला महादेवाच्या देवाकडे जाऊन शमी पूजन करीत असत अशी माहिती गावातील वृद्ध मंडळी सांगतात. 'पूर्वी गावामध्ये पाटील मंडळी 'भलोबा' बसवीत असत. त्याची मोठी मिरवणूक निघायची'[१०] असे हे उत्सव प्रिय माणकेश्वर गाव आहे.

विश्वरूपा नदीच्या विशाल चंद्राकृती पात्रासमोर भव्य 'विश्वेश्वर मंदिर' असून पूर्वी इथला प्रदेश दाट झाडीयुक्त असून नदीचे पात्र पूर्वी तुडूंब वाहत असे लोक पूर्वी इकडे फिरकायला घाबरायचे असे काही लोक सांगतात. परंतु सध्या नदीचे पात्र कोरडेच असते. कित्येक वर्षापासून या गावावर यवनांच्या दहशतीची दाट छाया पसरलेली होती. 'यवनांचे फार आघात सहन केलेले गाव आणि मंदिर असले तरी शंकराने अजूनपर्यंत त्या पवित्र स्थानाचा त्याग केलेला नाही. या मंदिराला काही भाविक लोक 'मल्लिकार्जुन' या नावानेही संबोधितात.'[११] विश्वरूपा नदीच्या पूर्व तिरावर असणारी शिव-सटवाई मंदिर नेहमी गर्दीन फुलून गेलेली असतात.

'मल्लिकार्जुन मंदिर हेमाडपंथी मंदिर का आदर्श नमूना है। इस मंदिर के दक्षिण बाजू

मे जमगिरी बाबा की समाधि है, वहाँ आकर श्रद्धालु बाबा के दर्शन करते है, इसी स्थान पर एक दातकोरणी का पेड है, जिसमे औषधीय गुण है, ऐसे लोगों मे मान्यता है ।'[१२] धनगर लोक दरवर्षी जखमाबाईचा उत्सव साजरा करतात याच महिन्यात लक्ष्मी देवीची यात्रा साजरी केली जाते. माणकेश्वरचे शिव मंदिर अतिप्राचीन, पुरातन कालीन, नितांत सुंदर, भव्य मनोहारी शिल्पाचा उत्तम नमुनाच आहे. 'पण त्या देवालयापेक्षा तेथे बाजूला असलेल्या सटवाईच्या देवळाला या भागात जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे. तेथे नवस करून देवी पावली तर बकरे कापले जातात'[१३] नवसाला पावणारी देवी म्हणून तिचा उल्लेख केला जातो.

माणकेश्वर गावामध्ये राम, हनुमान, नृसिंह, मरिआई, नागोबा, लक्ष्मीआई, जाखुमाई, आसरा, विठ्ठल रुक्मिणी ह्यांची मंदिरे आहेत. सावता माळी मंदिर, जैन मंदिराबरोबरच मेहबूब सुबानी दर्गा, फकीर साहेबबाबा दर्गा, चाँदसाहेब दर्गा माणकेश्वर येथे उल्लेखनीय आहेत. माणकेश्वर परिसरातील देवंग्रा येथील म्हसोबा मंदिर, हाडुंग्री येथील शिवखरा, आसरा माऊली मंदिर, कुंथलगिरांची जैनतीर्थ क्षेत्र, सिरसाव येथील ज्योतिबा आणि महालक्ष्मी मंदिर, लोणी येथील मारूती, विठ्ठल-रूक्मिणी, खंडोबा, ज्योतिबा, म्हसोबा ही माणकेश्वर भागातील प्रमुख ग्रामदैवते आहेत. याचबरोबर भांडगाव, पिंपळगाव, देवळाली, तांबेवाडी, शाकापूर, सावरगाव, वांगी, गोलेगाव, जवळा, येणेगाव, पिंपळवाडी, वाकडी ही गावे तसेच लोकांच्या घरातील देव्हारे असंख्य ग्रामदैवतांनी गजबजलेले दिसून येतात.

माणकेश्वर तसेच परिसरातील ग्रामदैवतांच्या आढाव्याबरोबरच माणकेश्वर, शिव, सटवाई, विश्वरूपा नदी या गोष्टीविषयी ग्रामस्थांमध्ये विविध मते असून ती अभ्यासनीय आहेत.

### १.२.१ 'माणकेश्वर'ची उत्पत्ती :

माणकेश्वर येथील बाबासाहेब अंधारे यांच्या मतानुसार 'मणिकेश्वर या नावावरून माणकेश्वर हे नाव पडले असावे.'[१४] कांही गावांच्या नावामागे एखादे विशिष्ट कारण असते.

त्या नावातून बहुधा असामान्य व्यक्ती वा त्या परिसरातील असामान्य घटना यांची आठवण जागृत ठेवली जाते. 'राजा दक्ष ने यहाँ माणिक लिंग की स्थापना की थी, इसलिए इस गाँव का नाम माणकेश्वर कहलाया ।'[१५] गावाच्या नामाभिधानास त्या परिसरातील एखादी ऐतिहासिक घटनासुद्धा कारणीभूत असलेली दिसून येते. पूर्वी या गावास 'माणिकवाडी' असे नाव असल्याचे काही लोक सांगतात. आज त्याचा अपभ्रंश माणकेश्वर असा झाला असावा.

## १.२.२ 'शिव' मंदिर विषयक विविध मते :

या 'शिव' मंदिरास काही भाविक 'मल्लिकार्जुन' तसेच'विश्वेश्वर' मंदिर असे संबोधतात. 'गावापासून दोन फर्लांगावर विश्वरूपा नदीच्या काठावर शिवाचे एक हेमाडपंथी सुरेख मंदिर आहे.'[१६] असाही एक मतप्रवाह आहे.

'Manakeshwar is a small Village Located at the distance of a miles from Osmanabad a dist. Headquarter of the region, right in the villege is a beautiful antiquarian remain in the form of a chalukyan architecture. It is Mahadeva temple.'[१७] शिव म्हणजे मंगलमय व कल्याण स्वरूप तत्त्व असून त्याची महादेव, महेश, निलकंठ, शंकर अशा असंख्य रूपावरून मंदिरास नामाभिधाने प्राप्त झाली. विश्वेश्वर, महादेव, मल्लिकार्जुन ही शिवाची रूपे असली तरी भक्तगण या मंदिरास शिव मंदिर असेच संबोधतात.

## १.२.३ 'सटवाई' विषयी विविध मते :

सटवाईचे मंदिर मूळ पार्वतीचे असावे असे गावकरी सांगतात. प्रा. रजनी जोशी यांच्या माहितीनुसार 'ही दोन्ही मंदिरे एकाच वेळची असून शंकराच मंदिर असत तिथं पार्वतीचही मंदिर असलेलं दिसून येते.'[१८] शेवटी देवी ही एकच आहे. तिने अनेक रूपे धारण केली आहेत अशी काही लोकांची समजूत आहे.

'मातृका सटवाईला म्हटलं जातं'[१९] या विधानाच्या अनुषंगाने प्राचीन काळी माणकेश्वर येथे मातृदेवतेची पूजा उपासना प्रचलीत असल्याचे स्पष्ट होते. 'या देवळा शेजारी एक जगदंबेचे देवालय आहे. ती देवी 'सटवाई' या नावाने ओळखली जाते'[२०] तसेच आराधी अश्रू बन्सी तेलंग यांच्या मतानुसार, 'हे मातंगीचे मंदिर आहे. इथं बळी देण्याची प्रथा पूर्वीपासून आजतागायत सुरू आहे.'[२१] शैव पुराणात शिवाचेही दहा अवतार आणि दहा अवतारातील पत्नींची नावे सांगितली आहेत. त्यातील नवव्या अवतारात शिव मातंग आणि पार्वती मातंगीच्या रूपात पुजली जाते असा उल्लेख सापडतो.

मातृदेवीची ही विविध रूपं असली तरी माऊली पण, मातृत्व एकच आहे. 'सटवाई हे स्त्रिलिंगी नाम असून ती एक शुद्र देवता'[२२] आहे असा उल्लेख आढळतो. बहुजनांची उपास्य देवता म्हणून परिसरातील लोक मोठ्या संख्येने नेहमी सटवाईला येतात. वंशवृद्धीचा आशीर्वाद देणारी देवता म्हणून सटवाई प्रसिद्ध आहे. सटवाईची छठ, संतुबाई रानसटवाई अशा निरनिराळ्या नावांनी भारतभर पूजा होते. 'शेवटी जरी षष्ठी (सटी, सटवी) म्हणजेच दुर्गा असे मानलेले असले तरी लोकमताप्रमाणे ती अविवाहित. 'म्हसोबाला नाही बायको आणि सटवाईला नाही दादला' माता असली तरी या देवतेला पती सहन होत नाही.'[२३] सटवाईला बकरं, कोंबड्याचा बळी दिला जातो तर शिवास पुरणपोळीचा गोड नैवद्य दाखवला जातो. महाराष्ट्रातील एकमेव ही दोन्ही अशी मंदिरे आहेत की, अगदी जवळजवळ आहेत हे येथील वैशिष्ट्य होय.

वरील विवेचनाच्या आधारे या देवतांचे कालांतराने ब्राह्मणीकरण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. परंतु लोकांच्या मतानुसार, परंपरेच्या आढाव्यानुसार ही सटवाईच असल्याचे सिद्ध होते.

### १.२.४ 'विश्वरूपा' नदीची उत्पत्ती :

नदीविषयक अद्‌भुतरम्य कथा हे भारतीय संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे. गंगा, नर्मदा,

भीमा यासारख्या महत्त्वाच्या नद्यांतून शिवाचा संदर्भ येतो. याची प्रचिती माणकेश्वर येथील विश्वरूपा नदीविषयी ही आहे. 'नदीच्या तिरावर उगमापासून अनेक शिव मंदिर असून येथील पात्रामध्ये शिवमंदिरावर कोरलेल्या तेहतिस कोटी देवांच्या मूर्तीचं प्रतिबिंब आपणास पाण्यात पडताना दिसतं म्हणून या नदीस विश्वरूपा नदी म्हणून ओळखले जाते.'[२४] तेथील लोकांच्या मतानुसार ही नदी विश्वरूपा असली तरी पुढे बाणगंगा नदीला मिळते आणि या नदीवर चांदणी धरण असून हा प्रवाह पुढे सीना नदीला मिळतो. परंतु उस्मानाबाद जिल्हा प्राकृतिक रचना अभ्यासली असता यामध्ये विश्वरूपा नदीचा उल्लेख आढळत नाही. वरील चारही संकल्पनेमध्ये माणकेश्वर येथे एक वाक्यता आणि ठोस निर्णायक मत नसल्यामुळे वरील मुद्दे अभ्यासणे महत्त्वाचे वाटते.

## १.३ शिव-सटवाईचे स्वरूप :

माणकेश्वर परिसरात अनेक ग्रामदैवते असली तरी शिव-सटवाईच्या स्वरूपाविषयी तेथील लोकांच्या माहितीत संदिग्धता आढळून येते. काही लोक म्हणाले, 'आम्ही फक्त दर्शनास येतो, या सर्व माहितीची आम्हाला कधी गरजच वाटली नाही' परंतु अशा उत्तराने समाधान मिळणार नसून या दोन देवतांसंबंधी असणारी तात्त्विक माहितीचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

### १.३.१ शिव :

शिव हे अनेक मंडळीचे कुलदैवत आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश या त्रिमुर्तीतला एक देव. तमोगुणी. प्रलयकाली सृष्टीचा संहारकता. आशुतोष म्हणजे थोड्या कालात संतुष्ट होणारा. कैलासावर वास्तव्य. पार्वती ही त्याची अर्धांगी होय. गजानन व षडानन हे पुत्र, नंदी हे वाहन आणि भैरववादी गण हे सेवक होत. शिवस्थानाचा लौकिक मोठा असून भक्तांच्या आख्यायिका गुरूचरित्रासारख्या ग्रंथातून वाचावयास मिळतात. अशी शिवालये अखंड भारतभर दिसून येतात. प्रत्येक गावोगावी शिव (महादेव) मंदिर असतेच परंतु महाराष्ट्रात प्रामुख्याने शिखर-

शिंगणापूरचा महादेव, जेऊर येथील शिवालय, सोलापूर येथील बसवेश्वर, उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक शिवायल, वेळापूर येथील अर्धनारीनटेश्वर, बीड येथील कंकालेश्वर, सिन्नर येथील शिव मंदिरे, पाटण तालुक्यातील महादेव मंदिर, रेठरे (बु.) ता. कराड येथील महादेव मंदिर, शेरे ता. कराड येथील भीमाशंकर मंदिर, सोनसळ, ता. कडेगाव येथील चौरंगीनाथाचे मंदिर, किल्ले मच्छिंद्रगड, ता. वाळवा येथील मच्छिंद्रनाथाचे मंदिर, वाटेगाव ता. वाळवा येथील पारेश्वर मंदिर, सातारा येथील येवतेश्वराचे मंदिर, देवराष्ट्र, ता. कडेगाव येथील सागरेश्वराचे मंदिर, तुळजापूर जवळील मद्गुलेश्वराचे मंदिर, कुरूंदवाड, जि. कोल्हापूर येथील खिद्रापूर मंदिर, कर्नाटक हंपी येथील महादेव मंदिर, सरूलता, ता. वाळवा येथील माणकेश्वराचे मंदिर असून या मंदिरात शंकराची मूर्ती आहे. सासवडचा कऱ्हेश्वर - वटेश्वर, कोकणातील वेळणेश्वर - कुणकेश्वर, गोव्यातील मंगेश, मध्यप्रदेशातील भगवान एकलिंगजी तसेच माणकेश्वर ता. भूम येथील सर्वात प्राचीन असणारे शिव मंदिर अभ्यासनीय आणि विशेष महत्त्वाचे आहे.

'शिव म्हणजे मंगलमय, कल्याणस्वरूप, सदाशिव तत्त्व यालाच परमात्मा किंवा आदिशिव असेही म्हणतात.'[२५] शिवपूजा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. 'तमिळ भाषेत शिव या शब्दाचा अर्थ लाल वर्णाचा असा होतो. त्यावरून शिव हे अनार्य, द्रविड लोकांचे दैवत होते असे म्हणता येते. पुढे आर्य व आर्येतर यांचा घनिष्ठ संबंध आला व त्यातून शिव ही भारतातल्या सामान्यजनांची सर्वश्रेष्ठ देवता बनली.'[२६] शिव अखिल भारतात सर्व जाती जमातींना पूज्य असा महादेव आहे. 'वश् या धातूपासून वर्णव्यत्यासाने शिव शब्द निष्पन्न झाला आहे. वश् धातूचा एक अर्थ प्रकाशने असा आहे. त्यावरून जो प्रकाशतो तो शिव असे म्हणायचे.'[२७] शिव हा स्वयंसिद्ध, स्वयंप्रकाशी आहे. तो स्वतः प्रकाशित राहून विश्वाला प्रकाशित करतो.

'शिव' ज्ञान, संस्कृती आणि योग याचा समन्वय आहे. देवीकोशातील उल्लेखानुसार महादेव, महेश, नीलकंठ, जगदीश, जगदीश्वर अशा विविध नावांनी 'शिव' देवतेस उल्लेखले

जाते.'[२८] त्याचबरोबर महाकालेश्वर, भालचंद्र, कर्पूरगौर, स्तेनपति, पिंगलाक्ष, भुजंगपतिहारी, आशुतोष,'[२९] महायोगी, भैरव, दिगंबर, धूर्जटी, भूतेश्वर, रूद्र, शंकर, त्र्यंबक, नटराज, नटेश्वर, अघोर, अट्टहास, अल्लमप्रभू, ऋषभ, गोकर्ण, घृष्णेश्वर, यक्षेश्वर, लुकलीश, पाशुपात, वृष, अंधकारसुरमर्दन, अघोरनाथ अर्धनारीनटेश्वर, कंकालमूर्ती, कालानिग्नरूद्र, गजहामूर्ती,'[३०] गजासूरमर्दन मूर्ती अशा असंख्य नावांनी शिव ओळखले तरी सर्वांच्या अंतर्यामी असणारे शिव एकच आहेत. 'त्याचबरोबर ते सर्व सजीवांच्या पर म्हणजे पलीकडे असल्याने त्यांना 'परमेश्वर' हे नाव आहे.'[३१] सांब, मंगेश, शंकर, गिरिजापती, पार्वतीपती अशी अनेक नावे आहेत. भारतात बारा ज्योतिर्लिंगे तर प्रसिद्ध आहेतच. वेगवेगळ्या कुलांची ती कुलदैवते आहेत.

शिवाचे भक्त शैव सांप्रदायिक. वेदपूर्णकाळ, वेदकाळ व वेदोत्तर काळात शिव या देवतेचे महत्त्व वाढू लागले होते. वेद, उपनिषदे, सांख्य व कौशितके, ब्राह्मणे या वेदोत्तरकालीन वाङ्मयात या देवाचा उल्लेख आढळतो. त्यानंतरच्या वाङ्मयात त्याचा उल्लेख पशुपत, कपिलेश्वर, उपमितेश्वर असाही करण्यात आला आहे. परंतु माणकेश्वर येथील मंदिरास विविध नावे असली तरी ते 'शिव' मंदिर म्हणूनच सर्वज्ञात आहे. शिव परिवारातील पार्वती, गणपती, स्कंद, नंदी, चंडीश, वीरभद्र, भैरव, बाणासुर इ. देवतांच्या कोरीव मूर्ती माणकेश्वर येथील शिव मंदिरात आढळून येतात. शिवाचे वाहन नंदी, माणकेश्वर येथील शिव मंदिरासमोर मोठा दगडी नंदी आहे. नंदीची पशू आणि मानव अशी दोन रूपे आहेत.

माणकेश्वर येथे शिव पूजा लिंगरूपात होते. 'जेव्हा मूर्ती व मंदिरे यांची निर्मिती झाली नव्हती, अशा त्या प्राचीन काळी लोक आपापल्या उपास्याची पूजा कोणत्या तरी प्रतिकाच्या आधारे करीत. ही प्रतिके मुख्यत्वे पाषाणाची असत. उपासक आपल्या प्रतिकाला विशिष्ट आकार देत आणि त्याला पूजोपचार समर्पीत त्यात लिंगाच्या आकाराचा पाषाण हे शिवाचे प्रतीक ठरले.'[३२] शिवशंकराच्या मंदिरामधून शिवाच्या काही ठिकाणी मूर्ती असतात पण बहुतांश

ठिकाणी सांबाचे पिंड (लिंग) असते. पती आणि पत्नी यांच्यातील हे एक अद्वैत शिवशक्ती स्वरूपाचे प्रतीक असते ही लिंगपूजा आहे. 'जरी पुराणकालापार्यंत लिंगपूजा पूर्वरूपाने प्रस्थापित झाली असली तरी लिंग हे शिवाचे जननेंद्रिय आहे ही कल्पना लोकमानसात जागृत होती.' [३३] तशा कथाही पुराणात आढळून येतात. अशीच शिवाराधना माणकेश्वरला लिंगाच्या स्वरूपात केली जाते. परंतु मंदिराच्या बाहेरील तिनही बाजूला शंकराची त्रिशूल, डमरू, मृग, परशू ही करभूषणे असलेली सुबक अशी ध्यानस्त मूर्ती कोरलेली दिसून येते. वालूकामय पाषाणापासून बनलेले हे शिवलिंग दक्षिण-उत्तर दिशेस असून नेहमी त्यावर तांब्याच्या भांड्यातून जलाभिषेक घातलेला दिसून येतो.

'मेलेल्या माणसांची भूते होतात, या धारणेतून स्मशान हे त्यांचे क्रीडास्थान ठरविण्यात आले असावे. त्यामुळे त्यांचा राजा हा चिताभस्म अंगाला फासतो व गळ्यात नरमुंडमाला धारण करतो अशी कल्पना उदित झाली. यातूनच शिव हा स्मशानवासी असल्यामुळे तो भुतांचा नियंत्रक असल्याची कल्पना निघाली आणि शिवमंदिरे स्मशानाशेजारी उभारली जाऊ लागली.'[३४] असंख्य गावातील शिवमंदिरे ही गावाबाहेर स्मशानभूमी जवळ उभा असलेली आजही दिसून येतात. यामुळेच शिवाला भूतेश्वर या नावाने संबोधले जात असावे. माणकेश्वर येथील शिव मंदिर स्मशानाशेजारीच आहे. माणूस मरण पावल्यावर त्याच्या घरातील मुलं शिवालयात जावून शिवापुढे पणती लावून ठेवतात. म्हणजे त्याला मुक्ती मिळू दे. त्यानंतरच डोक्यावर नवीन टोपी घालतात. हा कुळाचार माणकेश्वराला होताना दिसतो. 'पार्वतीची मूर्ती ही शंकराच्या मंदिरात एका बाजूला कुठेतरी कोनाड्यात सर्वसाधारणपणे असते, पार्वतीची अशी स्वतंत्र मंदिरे फारशी कुठे नाहीत.'[३५] येथे सटवाई देवीचे ठाणे असले तरी 'शिव' मंदिरात पुरणाचा नैवेद्य दिला जातो, हे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

### १.३.२ सटवाई :

महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्यात 'सटवाई' या नावाने एक स्थान असते. तेही देवीचेच

UNIVERSITY LIBRARY

शब्दकोशातील अर्थानुसार सटवाई, सटवी हे स्त्रिलिंगी नाम असून 'षष्ठिदेवता, एक शुद्र देवता, सटी, सट, सठी, दुर्गा देवता'[३६] अशी नावे असलेली दिसून येतात. 'रानसटवाई, षष्ठी, संतुबाई, सुभान, मेहमाता, जातमातृ'[३७] तसेच छठी, ब्राह्मी, कुमारी, बहुपुत्रिका, वारूषी, यनिका, रौंद्री, घोडा सटवाई'[३८] या नावाने तिला संबोधतात. पुणे जिल्ह्यातील भोसरी येथे सटवाईच्या नावाने असणारे बारा गोल पाषाण, सातारा जिल्ह्यातील आरफळचे सटवाई मंदिर, किल्ले मच्छिंद्रगड, ता. वाळवा येथेही सटवाईचे मंदिर आहे. शेळकबाऊ ता. कडेगाव येथील सटवाई मंदिरात देवीची मूर्ती पाषाणाची आहे.

बहुतेक ठिकाणी सटवाईची मंदिरे आणि मूर्ती नसतात. ती गावाच्या बाहेर नदीच्या, ओढ्याच्या काठाला, झाडाझुडपात, देवळीत, शेताच्या बांधावर, दगड, पाषाणाच्या स्वरूपात ठाणे असते. परंतु माणकेश्वर येथे सटवाईचे मंदिर असून मंदिरात यादवकालीन कालखंडातील मूर्तीविशेष जाणवणारी सटवाईची मूर्ती सुबक, कोरीव, मूळत:च अलंकृत असणारी उत्कृष्ट शिल्पकलेचा एक उत्तम नमुना आहे. मुखाला शेंदूर लावलेली, साडी, अलंकार परीधान केलेली सटवाई मूर्ती भक्तांचे चित्त एकाग्र करताना दिसते. शिव मंदिराला चिटकून असणारे सटवाई मंदिर म्हणजे कुठेही न आढळणारे दुर्मिळ असे वैशिष्ट्य आहे. सर्व भारतभर तिची वेगवेगळ्या नावांनी वेळप्रसंगी कुळाचार स्वरूपात पूजा केली जाते.

सटवाई एक बालसंरक्षक लोकदेवता. 'ॐ ऱ्हीं षष्ठीदेव्ये स्वाहा' हा मंत्र मंदिराच्या दर्शनी भागावर लिहिलेला असून 'सटवी हे षष्ठीचे मराठी भ्रष्टरूप आहे. बहुतेक साऱ्या हिंदी भाषी प्रांतातून तिचा छठ अथवा छठी असा उल्लेख येतो. छठ हेही 'षष्ठी' चे हिंदी रूप आहे. हरियाणात व राजस्थानात ती बेमाता किंवा बेहमाता या नावाने प्रसिद्ध आहे. याशिवाय जात-मातृदेवता, जातहारिणी, चर्चिका इ. तिची नावे म्हणजे तिच्या विकासातील विविध दुवे होत. बौद्धदेवी हारितांचाही षष्ठीशी निकटचा संबंध आहे.'[३९] षष्ठिपूजा, सटवीची अक्षरे, सटवी पूजन, जावळ (बट) हे विधी येथे आजही होतात. 'षष्ठी ही एक मातृका आहे.'[४०] बालघातक

असणाऱ्या या मातृकांना बालसंगोपन, वंशवृद्धीचे काम करावे यासाठी तिची पूजा आजही माणकेश्वर येथे मोठ्या भक्तीने केली जाते.

आंध ही मराठवाड्यात असलेली एक आदिवासी जमात असून सटवाई ही आंध लोकांची ग्रामदेवता काहींच्या शेतात आहे. 'म्हसोबा हा सटवाईचा भाऊ आहे असे ते मानतात.'[४१] याचबरोबर वेताळ, मुंजा, चेटक, झोटिंग, म्हसोबा, हडळ ही भुतांची काही नावे आहेत. 'सटवाई नावाचे एक भूत आहे.'[४२] असा उल्लेख असला तरी शिव परिवारात समाविष्ट होणाऱ्या ही परिवार दैवते पूजनीय ठरली आहेत. पेरणी करण्यापूर्वी म्हसोबा, आसरा, सटवाई ह्यांची पूजा करण्याची प्रथा येथे रूढ असल्याचे दिसून येते. 'संसर्गजन्य रोगप्रतिबंधक अनेक ग्रामदेवता आहेत. त्यामध्ये सीतळा, मरीआई, म्हसोबा, सटवाई, खेरमाता, मरिअम्मा, गंगाला इत्यादी अनेकांचा समावेश प्रातपरत्वे करावा लागेल.'[४३] ह्या ग्रामदेवता गावांचे रक्षण, संकट निवारण करणाऱ्या म्हणून त्यावर लोक श्रद्धा असल्याचे दिसून येते.

'ही देवी घराची रक्षणकर्ती, मुलांच्या जन्मावर लक्ष ठेवणारी, मूल देणारी आणि सौभाग्यवती स्त्रियांची परम सखी व सहाय्यकर्ती आहे.'[४४] माणकेश्वरची सटवाई ही अनेक जातीजमातींची कुलदेवता आहे. ग्रामदेवता म्हणून ही देशावर अनेक ठिकाणी याच देवीचे पूजन केले जाते. 'शंकराप्रमाणे ही आर्येतरांची देवता असून नंतर संस्कारांनी ती आर्यधर्मात शिरली असावी.'[४५] माणकेश्वराच्या सटवाईला प्रामुख्याने दर मंगळवारी व शुक्रवारी कोंबडी, बकरी ह्यांचा बळी देण्याची प्रथा आजही रूढ आहे. जी जी दैवते शिव-परिवारात समाविष्ट होतात, ती सहसा आपली मूळ तामस प्रवृत्ती सोडायला तयार नसतात. किंबहुना तामस प्रवृत्ती टिकवण्याच्या आग्रहामुळंच त्यांना शिव-परिवारात स्थान लाभते. शिव-परिवारात प्रवेश मिळवताना त्यांना आपले विघ्न कारित्व सोडावे लागत नाही. मद्यमासांची आवड दूर ठेवावी लागत नाही अन् भक्तांच्या अनैतिक नि अघोरी आकांक्षांच्या तृप्तीचं व्रतही मोडावे लागत नाही. शिव हा साऱ्या अशिवाकडे काहीशा उदारतेने पाहणारा आशुतोष देव आहे. याचे

साक्षात दर्शन माणकेश्वर येथे घडते. सटवाई ही सुद्धा शिव परिवाराचाच एक सदस्य ठरते.

शक्तीदेवता काही रूपात शिवापेक्षाही शक्तीसंपन्न झाल्याचे दिसून येते. माणकेश्वर येथेही सटवाईला मोठ्या संख्येने भक्तगण येताना दिसतात. सटवाईचीच ख्याती या परिसरात प्रसिद्ध असल्याचे आढळते. 'ती पुरूष देवतांच्या बरोबरीने सामर्थ्यसंपन्न, सर्वशक्तीमान मानण्यात येऊ लागली. परिणामी महिषासुरमर्दिनीचे शक्तीदेवतेचे रूप पाहून तिच्या भक्तगणात वेगाने वाढ झाली.'[४६] माणकेश्वरची सटवाई तसेच तुळजाई सुद्धा महिषासुरमर्दिनीचाच अवतार मानली जाते.

## १.३.३ उपासनेचे स्वरूप आणि प्रयोजन :

खेड्यातील जनसमूहावर धार्मिक समजुतींचा पगडा आजही प्रखर असलेला दिसून येतो. मानवी जीवनात शक्तीच्या उपासनेला अगदी प्राचीन काळापासून विशेष महत्त्व आहे. दु:ख दूर करणारी, नवजीवन देणारी, सुखावणारी म्हणून शक्तीची उपासना प्रेरणादायी ठरते. गावावर काही अरिष्ट कोसळू नये, सर्वत्र सुखशांती व समाधान नांदावे, संसर्गजन्य रोगांचे निवारण, भूताखेतांपासून संरक्षण, नैसर्गिक आपत्तीपासून निवारण, संततीसंवर्धन व त्यांच्या आयुरारोग्याची राखण, सौभाग्य चिरकाल टिकू दे, विहिरीला पाणी लागू दे, परीक्षेत उत्तम यशप्राप्ती होऊ दे, धनधान्य पिकू दे इ. अनेक प्रकारची कार्य या देवता करीत असतात. अशी लोकसमजूत असते. या सर्वांच्या मुळाशी तिने आपले रक्षण करावे हीच प्रबळ इच्छा असते. असाच समज माणकेश्वर येथील लोकजीवनात आढळून येतो.

## १.४ शिव - सटवाई मंदिर आणि मूर्ती :

माणकेश्वर येथील शिव - सटवाई ही दोन्ही मंदिरे जागृत देवस्थान म्हणून पंचक्रोशीत ख्याती प्राप्त लोकदैवते आहेत. जिथे अशी प्राचीन लोकदैवते असतात; त्या परिसरात त्याबद्दल अनेक तर्क-वितर्क स्वरूपात मौखिक माहिती असते. ठोस अशी सत्य माहिती लोकसमाजात आढळत नाही. त्याचेच दर्शन मला माणकेश्वर येथे आले. हे मंदिर कधी बांधले? कोणी

बांधले? मंदिरावरील मूर्ती कोणी चित्रविचित्र केल्या? पूर्वी येथे किती मंदिरे होती? मल्लिकार्जुनाचे हे स्वयंभू लिंग आहे का? सटवाई येथील लोकजीवनात कशी रूढ झाली? कोपराई विषयी काही सांगाल का? यासारख्या असंख्य प्रश्नाच्या मांडणीतून माणकेश्वर तसेच परिसरातील ग्रामस्थांना यासंबंधी खात्रीपूर्वक माहिती नसल्याने आढळून आले. केवळ तर्क-वितर्कच फक्त मौखिक परंपरेने आजही जोपासले आहेत. या प्रश्नांच्या सोडवणूकीतून मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

### १.४.१ 'शिव' मंदिर आणि शिवलिंग :

दुर्लक्षित पण स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना असलेले हेमाडपंती शिव मंदिर हे यादव काळातील मराठवाड्यातील सर्वात प्राचीन मंदिर आहे. 'Headquarter of the region, ritght in the villege is a beautiful antiquarian remain in the form of a chalukyan architecture'[४७] वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना असलेले शिवमंदिर गावाच्या पूर्वेस असून उगवत्या सूर्याची पहिली किरणे शिवलिंगाच्या गाभाऱ्यात पडून संपूर्ण शिवालय प्रकाशमय बनते. एका प्रचंड उंच मजबूत चबुतऱ्यावर मंदिराची उभारणी झाली आहे. ४ फूट उंच व्यासपीठावरूनच मुख्य मंदिराची रूपरेषा स्पष्ट होते. पूर्वेकडून हा चौथरा चढून गेल्यानंतर उत्कृष्ट कलाकौशल्याने सजलेल्या मंदिराचे महाद्वार दिसते. महाद्वाराच्या पायथ्याशी सोंडेत एकेक हार घातलेली सुंदर हत्तींची सुबक रांग कोरलेली आहे. हे हत्ती जणुकांही येणाऱ्या प्रत्येक भक्तांचे स्वागतच करीत आहेत. उपपीठावर 'प्रदक्षिणा पथ' आहे. प्रदक्षिणामार्ग भव्य असून काटकोनामधून मंदिर बांधणी असल्याने काटकोनामधून चालतच प्रदक्षिणा घालावी लागते. काही पायऱ्या चढून गेलात की 'उपपीठ' लागते. आणखी थोड्या पायऱ्यांवर 'मुख्यमंडप' आहे.

मुख्य मंडपाच्या चोहोबाजूंनी लहान धकक्या सारख्या भिंती असून आतील बाजूस कक्षासनासहित बैठक व्यवस्था आहे. मंडप चौरसाकृती असून छत सुंदर नक्षीकाम केलेल्या

चार खांबावर आधारलेला आहे. केंद्रभागी 'रंगशीला' आहे. अंतरालाच्या दुसऱ्या बाजूस दोन 'देवकोष्ठ' आहेत. गाभारा किंवा गर्भगृह १०' x १०' मापाचा आहे. थंड भासणाऱ्या भागाऱ्यात 'शिवलिंग' आहे. गर्भगृह मुख्यमंडपाच्या पृष्ठभागापासून सहा फूट खोलवर असून तेथे जाण्यासाठी आठ पायऱ्या उतरून जावे लागते. गाभाऱ्यात नऊ फूट लांबीची काळीभोर तेजस्वी स्वयंपू पिंड आहे. गाभाऱ्याची चौकट संपूर्ण दगडी असून ती एक सुंदर कलेचा नमुना आहे. त्याच्या मध्यावर गणपती कोरलेला आहे.

'The doorframe of the shrine is a huge door and may be referred to as Jyesthadvara of Hastini Vairiety, It is very rarely found in Maharashtra. The door way has seven decorative strolls. These dvaras hakhas are patra, rupa, stambha, puspa off shoots. The main decorative scroll is very minutely carved and presents a best piece of docorative art. There are Saivadvarpalas, Chamardharini, and nidhis at the lower part of the sakha. The door frame and the pillars are the characteristic feature of this temple. They are more elaborate is carving than those from Hottal or Raher"[४८]

प्रत्येक बाजूवर सूक्ष्म कोरीव काम, प्रत्येक कडा कोपऱ्यावर आहे. त्याच्यावर अष्टकोनाकृती आणि पुढे 'कुणी' व 'कुमुद' या ओतिवाकृती आहेत. संपूर्ण खांबाच्या बाजू व कडा या तिरप्या फुलींच्या आकाराच्या खचांमधून किचकाच्या आकृत्यांनी भरलेल्या आहेत. भिंतीतील खांब त्यामानाने कोरीव नाहीत. या मंदिराचा आणखी एक विशेष म्हणजे वरून पाहिल्यास मंदिराचा आकार कासवासारखा आहे. घडीव दगड एकावर एक ठेवून दगडांना आतून खाचा पाडून त्यात धातूंच्या खुंट्या ठोकून बांधकाम केलेले आहे.

देवालयाबाहेर एक नक्षीदार मगर कोरलेली असून मगरीच्या मुखातून वतलेले दूध व पाणी सरळ गाभाऱ्यातील कुंडात पडते. त्याचा अभिषेकासाठी उपयोग करतात. मंदिराच्या

बाहेरील भिंतीवर देवदेवतांच्या चारशेच्या जवळपास मूर्ती कोरलेल्या आहेत. हे मूर्तीशिल्प अत्यंत उत्कृष्ट आहे. 'शंकर, विष्णू, दत्त, भगवंत, रामपंचायतन, कृष्ण, जगदंबा, दशावतार अशा विविध देवतांचे सुबक मूर्तीशिल्प पहावयास मिळते.'[४९] मंदिर परिसरात दोन भव्य दिपमाळा असून देव, मुनी, राजे, योद्धे, नंदी, प्राणी, शिवतांडव, शिवविलाप, शिवाचे विषप्राशन, ध्यानस्त शिव, शिव चरित्रांतील रम्य प्रसंगावरील शिल्प, दोन परिचरासह प्रसवावस्थेतील मातृदेवी, रति, मदन, अप्सरा, जैन गुरूंची आशीर्वाद स्वरूपातील मूर्ती, मल्लयुद्ध चित्रीत करणारी मूर्ती, सर्पाने वेढलेला मनुष्य, हत्तीच्या पायाखाली चिरडलेला मुलगा, विंचू चावलेली देवता, हत्तींची झुंज, नंतरच्या उत्खननात सापडलेली महादेवाची पिंड आज सुद्धा जतन करून ठेवली आहे. पुरूषाकृती शिल्प बांधेसूद देहयष्टीच्या, तेजस्वी व करारी मुद्रेच्या असून यक्षींच्या व सुरसुंदरीच्या मूर्ती बारीक कंबर, पुष्ट वक्ष:स्थळ व अलंकार युक्त आहेत.

मंदिराच्या आतील भिंतीवर वेलपन्तीचे कोरीव नक्षीकाम असून बाह्य बाजूच्या भिंतीवर सुबक मूर्तिशिल्पकला दृष्टीस पडते. या संबंधी लोकांत काही अंधश्रद्धा प्रचलित असलेल्या दिसतात. एकंदरीत उभ्या, आडव्या, बैठ्या स्वरूपातील ४८० मूर्ती मंदिर परिसरात कोरलेल्या आहेत. मूर्ती उंच व सडसडीत असून मानवाकृतींचे चेहरे गोल आहेत. प्रसन्न स्मित दर्शविण्यासाठी ओठांची त्रिकोणाकृती घडण केली आहे. शिल्पाकृती भावपूर्ण आहेत. मूर्तींच्या मुखावर हास्य, करूण, प्रेम, वात्सल्य भाव कुशलतेने दाखविलेले आहेत.

मुख्यमंडपाच्या बाहेरील देखाव्यात नंदीमंडप नष्ट झालेला असूनही त्या चबुतऱ्यावर नंदी 'गजथर' दाखवतो. शिल्पकामातील उदात्तपणा व भव्यता यांचा मनावर सात्त्विक परिणाम होतो. 'पूर्वी इथं सात मंदिरं होती. त्यांना अकरा खांबी मंदिरे म्हणत.'[५०] अशा स्वरूपाची माहिती बऱ्याच ग्रामस्थांच्या तोंडून ऐकायला मिळाली. परंतु मुसलमानांच्या स्वाऱ्या सुरू झाल्यानंतर मंदिरांची तोडफोड करण्यात आली. या सर्व मंदिरांचे खांब, फुटलेल्या मूर्ती आजही मंदिर परिसरात इतस्त: पडलेल्या दिसून येतात. मूळ 'शिव' मंदिरावर केलेल्या हल्ल्याच्या

UNIVERSITY ... KOLHAPUR

खुणा आजही जिवंत आहेत. मंदिरावरील मूर्तींचे हात, पाय, चेहरा विद्रुप केल्यामुळे काही मूर्ती ओळखणे म्हणजे कष्टाचेच काम झाले आहे. मंदिर परिसरात एक समाधी असून सर्व मंदिर परिसर नदीपासून उंचावर दगडांच्या भिंतीनी बांधलेला दिसतो. मात्र आज फक्त त्यांचा पायाच शिल्लक आहे हे मंदिर शासनाच्या पुरातत्त्व विभाग, औरंगाबाद यांच्या ताब्यात असून शिव मंदिराची सेवा माणकेश्वरचे श्री. बबन गुरव करत असून पूजाविधी श्री. प्रमोद जोशी करतात. या दोन्ही मंदिराचे सेवक श्री. सुरेश जगदाळे हे आहेत.

### १.४.२ सटवाई मंदिर आणि मूर्ती :

सिंधु संस्कृतीपासून भारतीय समाजात मातृदेवतेची पूजा प्रचलित आहे. माणकेश्वरला शिव मंदिराच्या डाव्या बाजूला सटवाईचे मंदिर आहे. घडीव दगडांनी बांधलेल्या मंदिरासमोर होमकुंड आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून त्यामध्ये गर्भगृह व समोरचा सभामंडप अलीकडच्या काळात बांधलेला आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वार लहान आहे. वास्तूची जमिनीपासूनची उंची पाच फूट आहे.

सटवाई मंदिर रंगकाम केलेले असून प्रवेशद्वारावर चंद्र व डाव्या बाजूला सूर्याची देवता रूपातील चित्रं रेखाटले आहे. मूळ सटवाई मूर्ती अलंकार युक्त कोरलेली असून चतुर्भुज आहे. सध्या मूर्तीला दोनच हात आहेत. दोन पाय मुडपलेल्या स्वरूपात असून पायाखालील मूर्ती यौवन आक्रमणामध्ये भग्न झालेली आहे. मूर्तीच्या डोक्यामागे चक्र कोरलेले आहे. दोन्ही बाजूला हत्तीची चित्र काढलेली आहेत. मूर्ती च्या दोन्ही पायालगत ~~तींच्या दोन्ह [illegible]~~ लहान मूल सदृश्य मूर्ती कोरलेल्या आहेत. मुखाला शेंदूर लावल्याने मूळ मूर्तीचा मुखवटा अदृश्य झाला असून शेंदराच्या लेपामुळे तिचे रूप आकर्षक, चेहरा उठावदार, प्रसन्न व तेलकट भासतो. देवीला गारेचे डोळे अलीकडेच बसवलेले असून नेहमी वस्त्रपरीधान केलेली मूर्ती उभा असलेली दिसून येते. ही मूर्ती अखंड शिळेत कोरलेली असल्यामुळे प्रदक्षिणेला येथे जागा नाही. प्रदक्षिणा मंदिरा बाहेरच चौफेर घालावी लागते.

डोक्यावर मोत्यांनी सजवलेला मुकुट आहे. हा मुकुट नवरात्रातच घालतात. कानात कर्णालंकार, नाकात नथ, गळ्यात विभिन्न प्रकारचे सोन्याचे हार, चांदीचा तांब्या-वाटी, नववारी पातळ, चोळी असा देवीचा ऐवज असलेला दिसतो. मंदिरासमोर यज्ञकुंड, यज्ञशाळा विटांनी बांधलेल्या असून पडीक स्वरूपात आहेत. देवी स्थापनेचा निश्चित काळ आढळत नाही. परंतु मूर्तीचे रचनाविशेष अभ्यासले असता सटवाई देवीची मूर्ती ही शिव मंदिरातील भिंतीवर कोरलेल्या मूर्तीच्या कालावधी मधीलच असावी यात शंका नाही.

सटवाई मंदिराचा अलीकडे ट्रस्टकडून जीर्णोद्धार झाला असून शिखर विटांचे बांधलेले आहे. गर्भगृहाच्या अंतरंगात तसेच बाह्यांगावर कसलेही नक्षीकाम (कोरीव) नाही. मंदिर परिसरात लिंब, चिंच, पिंपळ ही झाडे आहेत. गतकालात हा प्रदेश दाट झाडीयुक्त असल्यामुळे कोणीही इकडे फिरकत नव्हते परंतु आज दररोज भक्तगण या देवीची मनोभावे उपासना, पूजाविधी करताना दिसतात. सटवाईचे सेवेकरी हे वंशपरंपरेने गुरव असून माणकेश्वर येथील बबन गुरव हे देवीची नित्यरोज सेवा करीत आहेत. माणकेश्वर परिसरामध्ये सटवाई ही खूपच प्रसिद्ध असून नवसाला पावणारी आई म्हणून ओळखली जाते.

### १.४.३ कोरीव शिलालेख :

मराठवाडा ही जशी संतांची, शिल्पकलेची भूमी, तशीच ती शिलालेखाची व ताम्रपटांची ही भूमी आहे. या भूमीने जशा राजवटी पाहिल्या, तशाच विविध संस्कृतीही पाहिल्या. 'मराठवाड्यात आजवर उपलब्ध झालेल्या शिलालेखाचे समग्र संकलन आणि संपादन डॉ. यु. म. पठाण यांनी केले आहे. त्यात 'माणकेश्वर येथील यादव सिंघणदेवचा दानलेख'[५१] हा यादवकालीन शिलालेख त्यांनी प्रथमच प्रसिद्ध केला आहे. माणकेश्वर येथील शिलालेख यादवकाळातील वैशिष्ट्यपूर्ण शिलालेख म्हणून ओळखला जातो. शिलालेख म्हणजे प्राचीन मराठी भाषेचा अक्षरबद्ध असा वाङ्मयीन ठेवाच होय. शिलालेखांची संहिता, भाषिक विशेषावरून आपणास या मंदिराचा काळ, तत्कालीन राजवट, लोकजीवन आणि

त्यातील आजही टिकून राहिलेल्या परंपरामागील लोकमानस यांचा योग्य प्रकारे अभ्यास करता येईल.

**I) संहिता :**

१. स्वस्ति स्त्रि सकु ११४५ सुभानु

२. संवछरे माघ सुध १०

३. लकमलकलीका वी

५. कासभास्कर (०) ? स्रिसिंघ

६. णदेव स्त्रीमाणकेस्वरी दत्त

७. अक्षरं (रां ?) किता

**II) वाचन :**

स्वस्ति स्त्रि सकु ११४५, सुभानु संवछरे, माघ सुध १०, रवि, स्वस्ति स्त्री यादवकुलकमलकलीकावीकासभास्कर स्रिसिंघणदेव स्रीमाणकेस्वरी दत्त अक्षरं (रां) किता.

**III) विवरण :**

माणकेश्वर येथील शिव मंदिरात हा महत्त्वाचा ऐतिहासिक शिलालेख आज अस्पष्ट स्वरूपात उपलब्ध आहे. त्याचा आकार ५५ सेंमी x २५ सेंमी असा आहे. सदरचा शिलालेख देवीच्या पायाजवळील पायरीवर खोदला नसून शिव मंदिराच्या खांबावर (स्तंभ-लेख) कोरलेला आहे. आज त्यात चुना, पेढा, तेल लावण्यामुळे गुळगुळीत व अस्पष्ट होताना दिसत आहे. यादवकालीन लोकभाषेचे मनोहर, देखणे रूप येथील शिलालेखात प्रकटले आहे. शिलालेखाच्या भाषेतील प्रत्ययप्रक्रियेचा चेहरा मोहरा व यादवकालीन साहित्याच्या भाषेच्या प्रत्ययप्रक्रियेचा चेहरा मोहरा यात विलक्षण साम्य आढळते.

'र' चे यादवकालीन वळण हे यातील विशेष लक्षणीय बाब होय ('संवछरे', 'रवि' हे शब्द व त्यातील 'र' चे लेखन पाहावे) या शिलालेखात सिंघणदेव यादवांचा स्पष्ट उल्लेख आहे, हेही याचे आणखी एक वैशिष्ट्य होय. याचे बिरूद 'स्री यादवकुलकमलकालीकावीकासभास्कर' असे आहे माणकेश्वरच्या देवतेच्या दानप्रीत्यर्थ हा लेख कोरला आहे, हेही स्पष्ट आहे.

**IV) भाषिक विशेष :**

भाषिक दृष्ट्या हा लेख विशेष महत्त्वपूर्ण असून; हा शिलालेख संस्कृत-मराठी असा संमिश्र असल्यामुळे त्यात तत्सम व तद्भव अशी दोन्ही प्रकारची शब्दरूपे आढळतात.

**अ) शब्दसंग्रह :**

१) तत्सम शब्द : स्वस्ति, यादव, कुल, कमल, भास्कर, देव, दत्त, माघ, रवि इ.

२) तद्भव शब्द : कलीका, वीकास, स्री, माणकेश्वर, संवछर, सुध इ.

**आ) वर्णप्रक्रिया :**

ऱ्हस्वीकरण : श्री > स्त्रि

दीर्घीकरण : विकास > वीकास, कलिका > कलीका

त्-लीप : संवत्सर > संवछर

श् > स् : शक > सकु

**इ) प्रत्यप्रक्रिया :**


विभक्ती : १) प्रथमा विभक्तीचा 'ड' प्रत्यय हे 'यादवकालीन मराठीचे एक लक्षणीय वैशिष्ट्य होय. ते या लेखातील 'सकु', 'सुभानु' इ. शब्दांत दिसते.

२) सप्तमी : ई-प्रत्यय माणकेश्वरी तत्कालीन राज्यकर्ता सिंघणदेव यादव यांच्या

नावाचा स्पष्ट उल्लेख शिलालेखात असून 'सकु ११४५' म्हणजे इ. स. १२२३ असा कालोल्लेख ही शिलालेखाच्या प्रारंभी आला आहे. '12th Century as the Probable Period of the Construction of this temple'[५२] शिलालेखाच्या अभ्यासानुसार माणकेश्वरचे शिव मंदिर हे उत्तर चालुक्य काळातील म्हणजेच यादवकाळातील हेमाडपंती असून त्याचा काळ शके ११४५ हाच निश्चित होतो.

**V**) 'माणकेश्वर येथील यादव सिंघणदेवाचा दानलेखाची प्रतिमा डॉ. यू. म. पठाण संपादित 'मराठवाड्यातील मराठी शिलालेख' या पुस्तकात छायाचित्रीत केली आहे.


### १.४.४ छायाचित्रे :



(छायाचित्र क्र. १ : माणकेश्वर येथील शिवलिंग)



(छायाचित्र क्र. २ : सटवाईची पाषाण स्वरूपातील मूळ मूर्ती)



(छायाचित्र क्र. ३ : शिव - सटवाई मंदिराचे छायाचित्र)



(छायाचित्र क्र. ४ : शिवमंदीरावरील कोरीव मूर्तीशिल्प)

वरील छायाचित्र क्र. १, २, ३ ही दुर्मिळ छायाचित्रे इ. स. १९८० मधील असून घरातील तसबीरीमधून काढून प्रा. डॉ. रजनी जोशी ह्यांनी दिली आहेत.

## १.५ समारोप :

आदिम अवस्थेत जीवन जगणाऱ्या माणसांना विश्वनिर्मितीबद्दल या विश्वाचे नियंत्रण करणाऱ्या शक्तीबद्दल कुतूहल वाटणे स्वाभाविक होते. या कुतूहलातून त्या विश्वनियंत्याविषयी कधी भीतीची, आदराची, श्रद्धेची भावना प्रकट झालेली दिसते. या श्रद्धामय भावनेतून भीतीतून, धार्मिक समजूती, देवदेवतांचे पूजन, उपासना, व्रतवैकल्ये, रूढी, समजूती निर्माण झालेल्या आहेत. 'ईश्वरावर श्रद्धा ठेवून माणूस सद्विचाराने सदाचरण करीत असेल तर परमेश्वरावरील त्या श्रद्धेला कोणाचाच विरोध नाही.'[५३] जेव्हा या श्रद्धा विवेकाच्या कसोटीला उतरत नाहीत तेव्हा ती अंधश्रद्धा ठरते. अंधश्रद्धा निर्मूलन ईश्वरी श्रद्धेचे निर्मूलन नव्हे. श्रद्धा माणसाला आत्मविश्वास, मानसिक सामर्थ्य देते तर अंधश्रद्धा असहाय, माणसाला हतबल करते. 'जादूटोणा व तत्सम अंधश्रद्धा विरोध कायद्यांचा' श्रद्धेला विरोध नाही.

भूतकाळात घडलेल्या घटनांचा मुळातून इतिहास तपासण्यासाठी घडलेल्या घटनेची पार्श्वभूमी अभ्यासणे गरजेचे ठरते. माणकेश्वर येथील शिव - सटवाईचे उत्सव आणि आख्यायिका अभ्यासण्याअगोदर ह्या सर्व नाविन्यपूर्ण घटकांचा आढावा घेणे तितकेच महत्त्वपूर्ण आहे. मंदिर बांधणे काही एक दिवसाचे काम नव्हे. तत्कालीन लोक किती एकजूटीने, विश्वासपूर्वक, श्रद्धापूर्वक, लोकजीवनाचाच एक भाग म्हणून या लोकदैवतांच्या विधिपूजेत रममाण असल्याचे आढळतात. याच सांस्कृतिक परंपरेचा वारसा आजही माणकेश्वर येथे उत्सवामधून टिकून आहे. आजही दैवतांच्या श्रद्धाकेंद्राशी लोकजीवन एकरूप झाल्याचे दिसून येते.

## संदर्भ आणि टीपा

१. रा. चिं. ढेरे, महाराष्ट्राचा देव्हारा, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, १९७८, पृ. १३.

२. शं. भा. येवले, जय अंबे कमलाभवानी, विनंद ऑफसेट प्रिंटर्स, सोलापूर, प्रथम आवृत्ती, १९९५, पृ. १.

३. प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती तिसरी, १९९५, पृ. १५७.

४. डॉ. विश्वनाथ शिंदे, लोकसाहित्यमीमांसा (भाग पहिला), स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९९८, पृ. ५.

५. लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोश, खंड-२, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पृ. ९११.

६. लक्ष्मणशास्त्री जोशी, तत्रैव, पृ. ९११.

७. लक्ष्मणशास्त्री जोशी, तत्रैव, पृ. ९११.

८. वा. गो. आपटे, (संपा.) विस्तारित शब्दरत्नाकर, वरदा प्रकाशन, प्रा. लि. पुणे, पुर्नमुद्रण, मे. ९८, पृ. ४५८.

९. विश्वास सराफ, 'माणकेश्वराची श्री सटवाई देवी' तरुण भारत, २२ ऑक्टोंबर, २००४, पृ.२.

१०. कुमार जोशी, (संपा.) 'वारी', ॐकार मुद्रा, पुणे, पृ. ८.

११. कुमार जोशी, तत्रैव, पृ. १७.

१२. रा.आ. अंधारे, 'माणकेश्वर', दै. समाचार, औरंगाबाद, २१ फरवरी, ९४.

१३. भारत गजेंद्रगडकर, धाराशिव ते उस्मानाबाद, ग्रंथाली ज्ञानयज्ञ, मुंबई, पहिली आवृत्ती, २००२, पृ. १९.

१४. बाबासाहेब अंधारे, रा. माणकेश्वर, ता. भूम, जि. उस्मानाबाद यांच्याशी केलेल्या चर्चेतून.

१५. रा. आ. अंधारे, उनि.

१६. भारत गजेंद्रगडकर, उनि.

१७. Prabhakar Deo, Temples of Marathawada, Publication Scheme, Jaipur, 1993, Page 5.

१८. प्रा. रजनी जोशी, रा. बार्शी, जि. सोलापूर यांच्या ध्वनिमुद्रित मुलाखतीतील मत.

१९. डॉ. माया पाटील, मुंबई, फोन वरील मुलाखतीतून मिळालेली माहिती.

२०. कुमार जोशी, उनि. पृ. १९

२१. अश्रू बन्सी तेलंग, रा. माणकेश्वर यांची ध्वनिमुद्रित, केलेल्या मुलाखतीतील मत.

२२. यशवंत दाते, (संपा.) महाराष्ट्र शब्दकोश, विभाग सातवा, महाराष्ट्र कोश मंडळ, पुणे, १९३८, पृ. २९९३.

२३. वसंत तुळपुळे, (अनु.) पुराणकथा आणि वास्तवाता, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७७, पृ. ११३.

२४. प्रमोद जोशी, रा. माणकेश्वर, ध्वनीमुद्रित मुलाखतीतील मत.

२५. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश, खंड नववा, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, १९७६, पृ. ३०६.

२६. महादेवशास्त्री जोशी, तत्रैव, पृ. ३१९

२७. महादेवशास्त्री जोशी, तत्रैव, पृ. ३०६.

२८. प्र. कृ. प्रभुदेसाई, देवीकोश, खंड-४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, १९६८, प्रकाशन ७ वे, पृ. ५९४.

२९. डॉ. जयंत आठवले, (संपा.) अध्यात्मशास्त्र, खंड नऊ, सनातन संस्कृति संस्था, मुंबई, आवृत्ती दुसरी, १९९५ पृ. १६.

३०. महादेवशास्त्री जोशी, उनि, पृ. खंड - २, पृ. ६९७.

३१. दत्ता कुलकर्णी, (संपा.) श्री लिंगपुराण, उमा पब्लिकेशन्स, पुणे, पृ. १७३.

३२. महादेवशास्त्री जोशी, उनि, पृ. ३०८.

३३. महादेवशास्त्री जोशी, तत्रैव, पृ. ३१३.

३४. महादेवशास्त्री जोशी, तत्रैव, खंड पाचवा, पृ. ५७२.

३५. गजानन खोले, कुळधर्म - कुलाचार - कुलदैवते, इंद्रायणी प्रकाशन, पुणे, २००२, पृ. ६५.

३६. डॉ. प्रल्हाद जोशी, आदर्श मराठी शब्दकोश, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, द्वितीयावृत्ती, १९८२ पृ. १२४०.

३७. गजानन खोले, उनि. पृ. १००.

३८. प्र. कृ. प्रभुदेसाई, उनि, खंड - ३ रा, पृ. ३२९.

३९. महादेवशास्त्री जोशी, उनि. पृ. ५०५.

४०. महादेवशास्त्री जोशी, तत्रैव, पृ. ५०६.

४१. प्रा. वा. ल. कुलकर्णी, (संपा.) प्रतिष्ठान, वर्ष-२०, अंक -११, ऑगस्ट : १९७१, पृ. ३४.

४२. महादेवशास्त्री जाशी, उनि, खंड पाचवा, पृ. ५७२.

४३. प्र. कृ. प्रभुदेसाई, उनि. पृ. १०८.

४४. प्र. कृ. प्रभुदेसाई, तत्रैव, पृ. ३२५.

४५. प्र. कृ. प्रभुदेसाई, तत्रैव, पृ. १०८.

४६. य. ना. कदम, प्राचीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००५, पृ. ११६.

४७. Prabhakar Deo, उनि, पृ. ५८.

४८. Prabhakar Deo, तत्रैव, पृ. ५८-५९.

४९. डॉ. दीपा सावळे, इतिहास संशोधन परिषदेत वाचलेला अप्रकाशित लेख, पृ. ३.

५०. भारत सपकाळ, रा. माणकेश्वर ह्यांची ध्वनिमुद्रित केलेल्या मुलाखतीतील मत.

५१. डॉ. यू. म. पठाण, (संपा.) मराठवाड्यातील मराठी शिलालेख, जाने. १९८९, कुलसचिव, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, पृ.१८.

५२. Prabhakar Deo, उनि. पृ. ५९.

५३. के. डी. खुर्द, (संपा.) अंधश्रद्धा निर्मूलन कायदा आहे तरी काय? महाराष्ट्र अं. नि. स., सातारा, २००५, पृ. ३९.